नियमित दिवाणी मुकदमा क्र. ११३/२०१३

(फैयाज गोधड वगैरे व. – वादी वि. मुस्तफा गोधड वगैरे –प्रतिवादी)

**:– नि. ११९ खालील आदेश –:**

१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले . वादी यांनी सदरचा अर्ज सदर दाव्यातील वादी क्र. ३ हे दिनांक २४/१/२०२२ रोजी मयत झाले असून त्यांना दाव्यात नमुद वादी नं. १अ ते १क, २अ, ४ व ५ हे कायदेशीर वारस आहेत. त्यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. त्यामुळे दाव्यामध्ये वादी क्र. ३ चे नांवासमोर ''मयत, वारस म्हणून वादी नं. १अ ते १क, २अ, ४ व ५ '' अशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा, दावा मिळकतीचे वाटप होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादी नं.३ हे मयत झाल्याने त्यांचे वारस म्हणून दाव्यातील वादी नं. १अ ते १क, २अ, ४ व ५ हेच कायदेशीर प्रतिनिधी आहेत .दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ अन्वये *''दाव्यातील वादी किंवा प्रतिवादी मृत्यू पावल्यास आणि दावा दाखल करण्याचा अधिकार टिकून राहिल्यास अशा वादी किंवा प्रतिवादीच्या कायदेशीर प्रतिनिधीस दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेतले जाते.''*

४. प्रस्तुत दाव्यातील वादी नं. ३ हे दिनांक २४/०१/२०२२ रोजी मयत झाले आहेत. प्रस्तुतचा दावा, वाटपासाठी दाखल केला असल्याने वादी नं.३ चे वारस देखील सदर दाव्यातील आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी वादी नं.३ चे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. सबब सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे . करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. नि. ११९ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. वादी यांना मयत वादी नं.३ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर दाखल करण्यास व अर्जातील मागणीप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. वादी यांनी सदर आदेशाच्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर सामील करावी.

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2022.08.23 10:46:45 +0530

दिनांक– २२/०८/२०२२

(अ. जो. बाचुळकर)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कुडाळ.